# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२

फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०

E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर


क्र.देव.वशि.जा. ४०० /२०२४ दिनांक: /०३/२०२४ 11 MAR 2024

## श्री. करवीर निवासिनी (श्री. महालक्ष्मी) देवस्थानकडे लागणारी शाली पुरविणे बाबतकामी दरपत्रक मागणी बाबत सुचना

श्री. करवीर निवासिनी देवस्थानकडे मान्यतवराचा सत्कार समारंभासाठी लागणारी दोन मिटर उलन शाल प्रति शालीचा दर सर्व शासकिय व स्थानिकचे करासहित खालील नमुद केले सुचनेनुसार **दिनांक १८/०३/२०२४ अखेर सायंकाळी १७:३० वाजेपर्यत देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर** मुख्य कार्यालय २४०२ ए वॉर्ड उभा मारुती चौक शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे सिलबंद लखोटयामधून दरपत्रक देणेत यावे.

## -: निविदाधारकांना सुचना :-

१) सदर निविदा व्दीलिफाफा पध्दतीने भरणेची आहे. त्याकरिता खालील प्रमाणे लिफाफा क्रं. १ (तांत्रिक लिफाफा) व लिफाफा क्रं. २ (दराचा लिफाफा/सोबत यादी) असे दोन वेगवेगळे लिफाफे तयार करुन सदर दोन लिफाफे सिल बंद करुन मोठया तिसऱ्या लिफाफ्यामध्ये घालून सिल बंद करणेचे आहेत. निविदा मा.प्रशासक देवस्थान व्यवस्थापन समिती यांचे नावे देणेची आहे. सदर मोठया लिफाफ्यावर दरपत्रकाचा विषय, दरपत्रक देणाऱ्याचे नाव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर लिहीणे आवश्यक आहे.

२) अपुर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

३) दरपत्रक भरणाऱ्यांनी पुर्ण भरलेल्या दरपत्रक दिले मुदतीपूर्वी कार्यालयामध्ये जमा करणेत याव्यात, मुदतीनंतर आलेल्या दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४) प्राप्त दरपत्रकापैकी कोणतीही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.प्रशासक देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे.

५) तांत्रीक लिफाफा नं. १ मध्ये नमुद कागदपत्रे अपूर्ण असलेस सदरचे दरपत्रक अपात्र ठरविणेत येईल व त्याचा लिफाफा नं. २ उघडला जाणार नाही.

६) ज्याचे दरपत्रक मंजूर होईल त्यानी आदेश मिळालेपासून बयाणा रक्कम म्हणून रु. १०,०००/- रोख देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयात जमा करणेचे आहे, सदरची रक्कम बिनव्याजी राहिल.

७) श्री.करवीर निवासिनी देवस्थानकडे व स्थानिक देवस्थानकडे चांगल्या प्रतिचे उलनची दोन मीटर लांबीची प्रति नग दर सर्व शासकिय व स्थानिकचे करासहित खालील रकान्यांत नमुद करावे, व सदरचे दरपत्रक लिफाफा क्र.२ सिलबंद करावा.

| क्र. | वर्णन व साईज | दर (सर्व शासकिय करासहित) |
| --- | --- | --- |
| १ | उलन शाल २ (दोन) मीटर | रु. प्रति नग |

८) मुंबई दुकाने संस्था रजिस्ट्रेशन / लायसन्स /शॉपअ‍ॅक्ट प्रमाणपत्र छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

९) जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०) वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र ( पॅन नंबर) जोडणे आवश्यक आहे.

११) ज्याची निविदा मंजूर होईल त्यांनी अटी शर्ती मान्य असले बाबतचे करारपत्र पूर्ण करुन देणेचे आहे, त्याचा खर्च दरपत्रक देणा-यांनी करणेचा आहे.

१२) बाजारात साहित्याच्या दरामध्ये चढ उतार झाला तरी मंजुर दरानुसार दरपत्रकाप्रमाणे मागणीनुसार साहित्य पुरविणेचे आहे.

१३) दरपत्रकामध्ये नमुद केलेले साहित्य इकडून मागणी केलेनंतर ते, खराब असलेचे निदर्शनास आलेस तात्काळ बदलून देणेचे आहे.

१४) वेळेमध्ये मागणीनुसार साहित्य पुरविणेत यावे, त्यात अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेणेची आहे.

१५) आपल्याकडून साहित्य पुरविण्यास विलंब झाला अथवा साहित्य शिल्लक नसेल, अशा परिस्थितीत स्थानिक बाजारपेठेतून आवश्यक साहित्य खरेदी करावे लागल्यास खरेदीची रक्कम दरपत्रक देणा-यांनी मंजुर दरानुसार होणा-या रक्कमेपेक्षा अधिक असल्यास दोन्हीमधील तफावतीची रक्कम जमा करणे बंधनकारक राहिल.

१६) दरपत्रकाच्या अनुषंगाने पुरवठया बाबत अथवा दराबाबत अथवा त्याअनुषंगाने याबाबत कोणताही प्रश्न व वाद निर्माण झालेस देवस्थान समितीचा निर्णय अंतीम राहील

१७) व्यवस्थापक यानी शालीची मागणी केलेनंतर पुरविणेचे आहे, साहित्य पोच झालेनंतर व्यवस्थापक अथवा देवस्थान व्यवस्थापन समितीचे अधिकृत कर्मचारी यांची पोच घेऊन बिलासोबत सादर करणेची आहे.

१८) मंजूर होणा-या दरपत्रक धारकाने शालीचे सर्व शासकिय व स्थानिक कर शासनास परस्पर जमा करणेचे आहेत. त्याची जबाबदारी देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर वर राहणार नाही.

१९) सदर दरपत्रकामधील साहित्य मागणीनुसार दरपत्रक धारकांने आपल्या जबाबदारीवर पोच करणेचे आहे. मंदिराच्या सुरक्षेच्यादृष्टीने वाहन मंदिरामध्ये आणणेस मज्जाव केला असलेने गाडी मंदिराच्या बाहेर उभा करुन तेथुन मंदिरामध्ये पोहोच करणेचे आहेत. सदर साहित्य पोलीस अथवा प्रवेशव्दारावरील सुरक्षा रक्षक यांनी तपासणी केलेस त्यांना सहकार्य करणेचे आहे व सदर साहित्य तपासुनच मंदिरामध्ये आणणेचे आहे. त्याबाबत कोणतेही सबब सांगणेची नाही.

२०) श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर विश्वस्त व्यवस्था, कोल्हापूर या नावाने श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिरासाठी विधी मंडळाने २०१८ च्या ३३ अन्वये विधेयक मंजुर केले असून, संबधीत विधेयक मधील अंमलबजावणीच्या अनुषंगाने विचाराधीन आहे अशा परिस्थितीमध्ये संबंधीत विश्वस्त व्यवस्था जर आपण करीत असलेल्या कामाच्या/सेवेच्या बाबत जर समाधानी असेल तरच ही

विश्वस्त व्यवस्था निविदे बाबत कायम ठेवायचे किंवा कमी करणे याबद्दल निर्णय घेईल. सदरचा निर्णय संबधी आपलेवर बंधनकारक राहिल.

२४) आजरोजी देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर या कार्यालया मार्फत जरी दरपत्रकाची प्रक्रिया कार्यन्वीत असली, तरी श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) ही वेगळी विश्वस्त व्यवस्था निर्माण करणेची प्रक्रिया चालू असलेने त्याची अंमलबजावणी झालेनंतर श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) प्रस्तावित विश्वस्त व्यवस्थेचे निर्णय आपल्यावर बंधनकारक राहतील.

२५) शासनाकडील व प्रशासनाकडील आदेश, परिपत्रक, शासन निर्णय तसेच देवस्थानचे ठराव, आदेश, हुकूम यामागिल व यापुढील आपणावर बंधनकारक राहतील, त्याचे उल्लघंन अथवा त्याचे विरुध्द कार्यवाही केलेस आपणावर कडक कारवाई करणेत येईल.

२६) वरील दरपत्रकाचा कालावधी मंजूर आदेशाच्या दिनांकापासून ३१/०३/२०२५ अखेर राहिल.

२७) सदरचे साहित्य देवताकृत्याशी संबधीत असलेने, दि.३१/०३/२०२५ रोजी दरपत्रकाचा कालावधी संपलानंतर पुढील निविदाप्रक्रिया कार्यन्वीत होऊन मंजूर आदेशाच्या दिनांकापासून याच दराने साहित्य पुरविणेत यावे.

**सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती**
**पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर**

**प्रत प्रसिध्दीसाठी:**

१) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी.

२) श्री.करवीर निवासिनी देवस्थान, श्री.केदारलिंग देवस्थान, श्री.सिध्दीविनायक (ओढयावरील गणपती)देवस्थान, श्री. दत्तभिंक्षालिंग देवस्थान, श्री.बिनखांबी गणेश मंदिर, श्री.बाळूमामा देवस्थान शाहूपुरी या देवस्थानचे नोटीसबोर्डवर

३) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.